कार्यालय पोलीस उप अधिक्षक,लाच लुचपत प्रतिबंधक विभाग,जालना दिनांक १२/०२/२०१९

टोल फ्रि क्रमांक १०६४

कार्यालय दुरध्वनी क्र. :- ०२४८२-२२०२५२

**आयटीआय कॉलेज घनसावंगी जि,जालना अतिरीक्त पदभार अंबड येथील प्राचार्य श्री.शिवाजी ओंकार बनगे यांना ४०००/- रुपयाची लाच घेतांना ॲन्टी करप्शन ब्युरो, जालना च्या पथकाने पकडले**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | आरोपीचे नाव, हुद्दा व पत्ता | :- | श्री.शिवाजी ओंकार बनगे, वय 47 वर्षे, प्राचार्य आयटीआय कॉलेज घनसावंगी, अतिरीक्त कार्यभार आयटीआय कॉलेज अंबड ता.अंबड जि.जालना रा.शारदा नगर,ता.अंबड जि.जालना |
| २ | गुन्हा घडला तारीख व ठिकाण | :- | दि.१२.०२.२०१९ रोजी आयटीआय कॉलेज अंबड ता.अंबड जि.जालना येथे. |
| ३ | लाचेची रक्कम | :- | ४०००/- रुपये |
| ४ | सापळा अधिकारी | :- | **श्री.व्हि.एल.चव्हाण,पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना** |

याबाबत हकीगत अशी आहे की, यातील तक्रारदार हे आयटीआय कॉलेज अंबड येथे नेमणुकीस आहेत. तक्रारदार यांचे वडील हे आजारी असल्याने त्यांना औषधोपचारा करीता ॲडमीट करुन त्यांचेवर वैद्यकिय उपचार करण्यात आला होता. तक्रारदार यांचे वडीलांवर झालेल्या खर्चाचे वैद्यकिय प्रतिपुर्तीचे बील मागील दोन महिन्या पासुन आयटीआय कॉलेज अंबड येथे दाखल करण्यात आले होते. सदरचे बिल हे प्रभारी प्राचार्य श्री.बनगे यांचे सहीने त्यांचे वरिष्ठ कार्यालयास पाठविले होते.सदरं वैद्यकिय प्रतिपुर्तीचे बील मंजुर होवुन आले होते. प्रभारी प्राचार्य श्री.बनगे, यांनी तक्रारदार यांना सांगीतले की, तुमचे मेडीकल बिल मंजुर होवुन आले असुन तुमच्या बँक खात्यात जमा झाल्यानंतर मला सदर वैद्यकिय बील मंजुर करुन दिल्याबद्‌ल मोबादला म्हणुन ५०००/ रुपये द्यावे लागतील. त्यावेळी तक्रारदार यांनी प्राचार्य श्री.बनगे यांना नाईलाजास्तव हो म्हणाले. तक्रारदार यांची लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागा कडे तक्रार दिली.

दि.१२.०२.२०१९ रोजी अंबड येथे जावुन प्राचार्य श्री.बनगे यांची पंचासमक्ष पडताळणी करण्यात आली. पडताळणी दरम्यान पंचा समक्ष प्रभारी प्राचार्य श्री.बनगे यांनी तक्रारदार यांचेकडे सदर कामासाठी ४०००/- रुपयाची मागणी केली व लाचेची रक्कम स्विकारण्यास तयार झाल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरुन १२.०२.२०१९ रोजी अंबड येथील आयटीआय कॉलेज अंबड येथे लाचेचा सापळा लावला असता प्रभारी प्राचार्य श्री.बनगे यांनी तक्रारदार यांना ४०००/-रुपये लाचेची मागणी पंचा समक्ष करुन लाचेची रक्कम स्विकारली असता त्यांना लाचेच्या रक्कमेहस पकडण्यात आले. प्रभारी प्राचार्य श्री.बनगे यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्याबाबत पुढील कार्यवाही चालु आहे.

**तसेच ॲन्टी करप्शन ब्युरो कडुन अवाहन करण्यात येते की कोणी लोक सेवक शासकीय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास किंवा खाजगी व्यक्ती मार्फत कोणी लाचेची मागणी करीत असल्यास ०२४८२-२२०२५२, तसेच टोल फ्री क्रमांक १०६४ वर संपर्क करावा. तसेच पोलीस उप अधिक्षक जालना मो.नं.८९७५७६२९०६ पोलीस निरीक्षक मो.नं. ९८२३१४२६३२, ९७६७७४७७७४ वर संपर्क करावा.**

( रविंद्र डी.निकाळजे )

पोलीस उप अधीक्षक,

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,जालना